## Walchand College of Arts and Science,

# ADMISSION NOTICE

**Academic Year: 2021-22**

Admission process for academic year 2021-22 will be communicated soon as per the instruction by School Education Department, Solapur, Government of Maharashtra, PAH Solapur University, Solapur and UGC

**Principal**

| शिक्षण संचालनालय<br>(माध्यमिक व उच्च माध्यमिक)<br>महाराष्ट्र राज्य<br>मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१ | सत्यमेव जयते<br>महाराष्ट्र शासन | Government of Maharashtra<br>DIRECTORATE OF EDUCATION<br>(Secondary & Higher Secondary)<br>Maharashtra State<br>Central Building, Dr.Annie Besant Road, Pune-1 |
|---|---|---|

w'site : education.maharashtra.gov.in Phone : (020) 2612 0361 e-mail : doehighersec@gmail.com


क्र.विद्या-ए-1/11.प्रवेश/2021/ 2275

दिनांक-19/07/2021

20/07

**प्रति,**

**विभागीय शिक्षण उपसंचालक, (सर्व)**

**विषय :- राज्यातील सन.2021-22 मधील इ.11वी प्रवेशाबाबत.**

**संदर्भ:-** 1.शासन निर्णय क्र.परीक्षा.0521/प्रक्र.39/एसडी-2 दि.12/05/2021
2.शासन निर्णय क्र.परीक्षा.0521/प्रक्र.43/एसडी-2 दि.28/05/2021 (2)
3.शासन निर्णय क्र.परीक्षा.0621/प्रक्र.52/एसडी-2 दि.24/06/2021
**4.इ.11वी सामाईक प्रवेश परीक्षा समितीची बैठक दि.25/06/2021.**
**5.इ.11वी राज्यस्तर प्रवेश नियंत्रण समिती बैठक दि.17/07/2021**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, संदर्भ क्र.1 अन्वये सन.2021 मधील राज्य मंडळाची शालांत प्रमाणपत्र (इ.10वी) परीक्षा रद्द करण्यात आलेली आहे आणि संदर्भ क्र.2 अन्वये इ.10वी साठी मूल्यमापन कार्यपद्धती विहित करण्यात आलेली तसेच सन.2021-22 च्या इ.11वी प्रवेशासाठी संपूर्ण राज्यामध्ये एक सामाईक प्रवेश परीक्षा (CET) लागू करण्यात आलेली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र राज्यातील, राज्यमंडळाशी संलग्न असलेल्या सर्व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये (इ.11वी मध्ये) प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या (इ.10वी उत्तीर्ण) विद्यार्थ्यांसाठी एक सामाईक प्रवेश परीक्षा (CET) आयोजित करण्यात येईल. त्याबाबत राज्यमंडळाकडून कार्यवाही सुरु आहे.

सदर सामाईक प्रवेश परीक्षा ही विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक आहे परंतु इ.11वी प्रवेश देतांना सामाईक प्रवेश परीक्षा (CET) दिलेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश देण्यात येतील आणि अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश झाल्यानंतर उर्वरित जागांवर इतर विद्यार्थ्यांना इ.10वी मूल्यमापन पद्धतीनुसार प्राप्त गुणांच्या आधारे प्रवेश दिले जातील. अर्थात सामाईक प्रवेश परीक्षेची कार्यवाही पूर्ण होत नाही तोपर्यंत इ.11वी मध्ये प्रवेश देता येणार नाहीत.

सामाईक प्रवेश परीक्षेनंतर राज्यातील सन.2021-22 मधील इ.11वी प्रवेश प्रक्रियेबाबत कार्यपद्धती स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. तोपर्यंत कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयांना इ.11वी साठी प्रवेश प्रक्रिया सुरु करता येणार नाही.

सर्व संबंधित घटकांना याबाबत अवगत करावे.

**(दिनकर टेमकर)**
**शिक्षण संचालक**
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

**प्रत, माहितीस्तव,**
**मा.आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे**